*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीचे तेजस्वी दीपस्तंभ : प्रा. डॉ. एन. डी. पाटील

**प्रा. डॉ. बाबुराव घुरके,** भूगोल विभाग,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर, baburao.ghurake@rcsc.ac.in

---

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राच्या पुरोगामी, परिवर्तनवादी चळवळीसाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्च करणारे जेष्ठ पुरोगामी विचारवंत, गेल्या सात दशकांहून अधिक सामाजिक-राजकीय घडामोडींचे साक्षीदार, शेतकरी व कष्टकरी जनतेचा बुलंद आवाज, शोषितांचा आधारवड, माजी सहकार मंत्री, रयत शिक्षण संस्थेचे वाली, अभ्यासू, व्यासंगी आणि परखड व्यक्तिमत्व म्हणजेच प्रा. डॉ. एन.डी. पाटील. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात शोषणमुक्त व समताधिष्टीत समाज निर्मितीसाठी अव्याहतपणे कार्यरत राहिलेले भाई एन. डी. पाटील हे डाव्या आघाडीचे नेते तर होतेच याशिवाय ते महाराष्ट्रातील परिवर्तनवादी सामाजिक व प्रबोधनाच्या चळवळीत काम करणाऱ्या अनेक संस्था व संघटनांचे आधारस्तंभ होते. रयत शिक्षण संस्था, महात्मा फुले शिक्षण संस्था इस्लामपूर, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्था बेळगाव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, महाराष्ट्र राज्य सीमाप्रश्न समिती, जागतिकीकरण विरोधी कृती समिती, वीज दरवाढ विरोधी कृती समिती, नर्मदा बचाव आंदोलन इ. अनेक सामाजिक व परिवर्तनवादी संस्था, संघटना व चळवळींमध्ये भाई प्रा. एन. डी. पाटील यांनी दिलेल्या योगदानामुळे आमच्या पूर्वसुरीनी दिलेला पुरोगामी आणि परिवर्तनाचा विचार पुढे नेण्याचे मौलिक कार्य घडून आले आहे. शोषणामुक्त समाज निर्मितीसाठी डॉ. एन. डी. पाटील यांनी मार्क्स लेनिनवादी विचारधारेचे अधिष्ठान स्वीकारून समताधिष्टीत समाज निर्मितीसाठी आपल्या कार्याला महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जोड देऊन आपले संपूर्ण आयुष्यच या एकमेव ध्येयपूर्तीसाठी मिशनरी झीलने व्यतीत केले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सहवासात वाढलेले एन. डी. पाटील सर हे आज त्यांच्या विचारांचे खरेखुरे वारसदार आहेत हे सिद्ध झाले आहे.

**भाई प्रा.एन. डी. पाटील: अल्पपरिचय :**

सात दशकांहून अधिक काळ संघर्षरत राहिलेले दिवंगत नेते डॉ. एन. डी. पाटील यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात ढवळी येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. ढवळी येथे प्राथमिक शालेय शिक्षण पूर्ण करून बागणी येथे पुढील शिक्षणासाठी दाखल झाले. तत्कालीन सत्यशोधक चळवळींचा प्रभाव असलेले पुरोगामी शिक्षक काळू सावळा माळी यांच्याशी त्यांची भेट झाली आणि खऱ्या अर्थाने सत्यशोधकी विचार या काळात त्यांच्या मनात रुजले. कठोर परिश्रमाच्या बळावर मॅट्रिक परीक्षा चांगल्या गुणांनी पास होऊन ढवळी गावात त्यांनी नवा आदर्श घडविला. पुढील शिक्षण त्यांनी कोल्हापूर येथील राजाराम कॉलेज मधून पूर्ण केले. कोल्हापूर हे त्या काळात राजकीय आणि सामाजिक चळवळींचे केंद्र बनले होते.

विधी शाखेचे पदवीधर असलेल्या एन. डी. सरांनी प्रारंभी सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे १९५४ ते १९५७ या काळात प्राध्यापक म्हणून तसेच 'कमवा व शिका' या योजनेचे प्रमुख व रेक्टर म्हणून उत्कृष्ट काम केले. १९६० मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर येथे प्राचार्य म्हणून काम केले. तत्पूर्वी १९४८ मध्ये त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. मुंबई गिरणी कामगार संघटनेचे सरचिटणीस म्हणून त्यांनी धुरा सांभाळली. परिवर्तनाच्या सर्व पातळ्यांवरील घटना, घडामोडींशी गेली अनेक दशके ते जोडले गेले होते.

**शोधनिबंधाचा हेतू :**

गेल्या सात दशकाहून अविश्रांतपणे भारतीय संविधानाच्या सरनाम्याला अभिप्रेत असलेल्या नवसमाज निर्मितीच्या कामामध्ये एन. डी. सरांनी जे काम केले आहे त्याची ओळख नव्या पिढीला करून देणे ही आज अत्यंत निकडीची गरज बनली आहे. याच भूमिकेतून प्रस्तुत शोधनिबंधात'महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीचे तेजस्वी दीपस्तंभ म्हणजे प्रा. डॉ. एन. डी. पाटील' या विषयावर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**भाई प्रा.एन. डी. पाटील:चळवळींचे महामेरू**

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवा मुक्ती संग्राम, गिरणी कामगारांचा लढा, भूमिहिनांसाठी आंदोलने, एनरोन विरोधी आंदोलन, धरणग्रस्त व विस्थापितांची आंदोलने, अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ, शेतमालाला किफायतशीर भाव मिळविण्यासाठी केलेले लढे, कापूस एकाधिकार योजना, महागाई आणि उपासमार विरोधातील आंदोलन, शेगाव ते नागपूर विधानसभेवर पायी चालत काढलेली दिंडी, महाराष्ट्र राज्य वीज संघर्ष समितीचे आंदोलन, भूविकास बँकेच्या मनमानी कारभाराविरुद्धचे आंदोलन, साराबंदी चळवळ, शिक्षणविषयक श्वेतपत्रिका, सेझ विरोधी आंदोलन, उच्च न्यायालय खंडपीठ, दुष्काळ निवारण मोर्चा, शेतकरी आंदोलने, कोल्हापुरातील टोलविरोधी आंदोलन, पिण्याच्या पाणी हक्काचे आंदोलन, कापूस दर आंदोलन, जागतिकीकरण विरोधी लढा अशा अनेक आंदोलनातून, मोर्चातून लाठीमार, तुरुंगवास, गोळीबार झेलून सामान्य जनतेचे, कष्टकर्यांचे बळ वाढविले.

महाराष्ट्राच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात, शेतकऱ्यांच्या लढ्यात, प्रबोधनाच्या आघाडीवर, शोषणमुक्त समताधीष्टीत समाजरचनेसाठी कोणतेही पद असो किंवा नसो वयाच्या नव्वदीतही अखंड संचार करीत. मोर्चे, घेराव, निदर्शने, उपोषणे, भ्रष्ट मंत्री आणि अधिकारी यांची झाडाझडती, न्यायाची पाठराखण, अन्यायाशी टक्कर, भल्याभल्यांना दिलेली आव्हाने, ठोकरून लावलेली आमिषे, सडेतोड युक्तिवाद, घणाघाती भाषणे, अखंड चळवळी हा एन. डी. सरांचा जणू श्वासोछवास होता. शैक्षणिक धोरण, सीमाप्रश्न, खासगीकरण, शेती इ. विविध भूमिकातून एन. डी. सरांनी आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत संघर्ष केला. राज्यघटनेने रुजवलेल्या स्वातंत्र्य, संधीची समानता आणि धर्मनिरपेक्षता, समाजवाद या लोकशाही मुल्यांवर पूर्ण निष्टा ठेऊन तो विचार समाजात रुजवण्यासाठी ते कार्यरत होते.

केवळ आपल्या पक्षापुरते राजकारण न करता एन. डी. सरांनी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेतेपद, आघाडी सरकारच्या समन्वय समितीचे अध्यक्षपद भूषवले होते. २३ वर्षे आमदार असलेल्या सरांनी सहकारमंत्रीपदही भूषविले. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी घेतलेले निर्णय महाराष्ट्राच्या दीर्घकालीन हिताचे ठरलेले आहेत. आपल्या तत्वांशी त्यांनी कधीही मुरड घातली नाही.

अखंड वाचन, प्रखर प्रज्ञावाद आणि बेडर लढवय्येपणा ही सरांच्या भात्यातील अजेय आणि अमोघ शश्त्रास्त्रे होती.मार्क्स, फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे तत्वज्ञान ही एन. डी. सरांची वैचारिक वाघनखे होती शिवाय त्यांच्या विचारांची मशाल त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत पेटत ठेवली. लढणे आणि संघर्ष करणे हेच त्यांच्या जीवनाचे अंतिम ध्येय होते.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि सीमा आंदोलनात सक्रीय सहभाग :**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी आणि महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील दहा लाख मराठी भाषिकांचा प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट करून घेण्यासाठी झालेल्या प्रत्येक आंदोलनात एन. डी. सरांनी १९५८ पासून सक्रीय सहभाग घेतला आहे. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे राज्य मिळाले या आनंदात कॉंग्रेस पक्षाबरोबर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ करणारे मशगुल झाले. परंतु आपल्या दहा लाख बांधवाना आपण कर्नाटकातच सोडून दिले याची जाणीव काँग्रेस पक्षाला राहिली नाही. शेतकरी कामगार पक्ष आणि दावे पक्ष यांनी या प्रश्नाला सतत चालना देऊन हा प्रश्न जिवंत ठेवला आहे.

कर्नाटक आणि महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्ष सत्तेवर असल्यामुळे या प्रश्नाकडे सरकारने लक्ष दिले नाही. दाजीबा देसाई यांच्या नेतृत्वाने सीमा भागात अभूतपूर्व असे साराबंदी आंदोलन केले. जोपर्यंत सीमा प्रश्न सुटत नही तोपर्यंत कुणीही सरकारला कसलाच सारा भरायचा नाही असे ठरले. एन. डी. सरांनी या आंदोलनाबाबत बोलताना म्हटले कि एवढी मोठी साराबंदी चळवळ करून राज्यकर्त्यांकडे राजकीय इच्छाशक्तीच नसल्यामुळे हा प्रश्न अजून तसाच चिघळत ठेवलेला आहे. एन. डी. सर हे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातले ते एक बिनीचे शिलेदार होते.

राज्यातील अनेक पुरोगामी चळवळींशी एन. डी. सरांचा निकटचा संबंध होता. अनेक आंदोलनांचे त्यांनी नेतृत्व केले. डॉ. नरेंद्र दाभोळकर व कॉ. गोविंद पानसरे यांच्या धर्मांध शक्तींनी केलेल्या हत्येचा सखोल व जलद तपासासाठीची मोहीम या व इतर अनेक जनआंदोलनात एन. डी. सरांचा सिंहाचा वाटा राहीला आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन तीन विद्यापीठांनी डी. लिट. ही सन्माननीय उपाधी देवून सन्मानित केले होते.

**समारोप:**

पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक वाटचालीचा चालता बोलता इतिहास व आम्हा तरुणांचे मार्गदर्शक, जनहिताशी अखेरपर्यंत बांधिलकी जपणारा तत्वनिष्ट व निस्वार्थी, लेखक, वक्ता, समाजसुधारक, सर्वसामान्यांचे नेते एन. डी. सरांच्या रूपाने दि. १७ जानेवारी २०२२ रोजी काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळींमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एन डी सर हे पुरोगामी, परिवर्तनवादी, लोकशाही समाजवादासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांसाठीचे एक चालते बोलते विद्यापीठ होते. त्या विद्यापीठाचा चालतेबोलतेपणा आज खऱ्या अर्थाने संपला. त्यांचे पुरोगामी विचार, शिकवण पुढे नेवूया हीच सरांना आदरांजली. भाई एन. डी. सरांना लाल सलाम! लाल सलाम!!

**संदर्भग्रंथ सूची :**

1. प्रा. एन. डी. पाटील, 'माझी संघर्षयात्रा', विजिगीषा प्रकाशन, कोल्हापूर

2. विजया पाटील, 'प्रा. डॉ. एन. डी. पाटील (चळवळींचा महामेरू! बहुत जनांसी आधारू)', मुक्ता पब्लिशिंग हाऊस, प्रा. लि., कोल्हापूर

3. अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर, २८ वे राष्ट्रीय अधिवेशन, संशोधन पत्रिका २०१९

4. प्राचार्य टी. एस. पाटील, 'भाई प्रा.एन. डी. पाटील कार्य आणि कर्तुत्व', भाई प्रा. एन. डी. पाटील कार्यगौरव समिती, कोल्हापूर

5. प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील आणि प्रसाद माधव कुलकर्णी, 'बुलंद कर्मयोगी', प्रा. एन. डी. पाटील प्रतिष्ठान, कोल्हापूर